SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 **Stat Cell** : 0231-2609147.
Fax : 0091-231-2693294 **website : www.unishivaji.ac.in**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
फॅक्स : ००९१-२३१-२६९३२९४ E-Mail : statcell@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०१९-२०/ दिनांक : 22 JAN 2020

No 0841 -

## स्मरणपत्र क्रमांक १

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :** **अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०१९-२०**
डीसीएफ मध्ये माहिती भरणे व अपलोड करणेबाबत...

**संदर्भ :** १) मा.डॉ. धनराज माने, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट राज्य, पुणे यांचे क्र .उशिसं/सांख्यिकी/ एआयएसएचई /२०१९-२०/१६५८९ दिनांक ३०/१२/२०१९ रोजीचे पत्र.
२) जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०१९-२०/४८१, दिनांक ०१/०१/ २०२० रोजीचे परिपत्रक

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम २०१९-२० वेबपोर्टलवर माहिती नोंद करण्याबाबत कळविलेले आहे. सदर वेबपोर्टलवर (www.aishe.gov.in) माहिती नोंद करण्याची सुरवात दिनांक ०१/०१/२०२० पासुन झालेली आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी आपली प्रशासकीय, शैक्षणिक, व शैक्षणिकेत्तर बार्बीची सन २०१९-२० करीता दिनांक ३० सप्टेंबर हया संदर्भ दिवसा पर्यंतची माहिती नोंद करावयाची आहे. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे कार्यालय यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार दिनांक ३१/०१/२०२० पर्यंत वेबपोर्टलवर माहिती नोंदवावयाची आहे. सदरची माहिती भरण्यास विलंब केल्यास किंवा एकाच वेळेस अनेक महाविद्यालयांनी माहिती भरण्यास सुरवात केल्यास सर्व्हरला प्राब्लेम होतो व माहिती वेळेत नोंद न झाल्याने मानधन वेळेत प्राप्त होत नाही. तसेच डीसीएफ अपलोड करते वेळी काही Error आल्यास ते वेळेत Support team कडुन दुरूस्त करून घेता येत नाही. सदर बाब विचारात घेता माहिती तात्काळ भरून विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

दि.१७/०१/२०२० रोजी सर्व संलग्नित महाविद्यालयांकरीता AISHE कार्यशाळेचे आयोजन केले होते व सदर कार्यशाळेमध्ये बऱ्याचश्या अडचणींचे निरसन करण्यात आले होते तथापी, वेबपोर्टलवर माहिती नोंद करत असता काही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्ष, खोली क्रमांक ३१३, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.

कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव

टिप :- सदरचे स्मरणपत्र AISHE पोर्टलवर माहिती नोंद न केलेल्या महाविद्यालयांसाठी आहे.